# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## ग प्रभाग कार्यालय
## कार्यपत्रिका क्रमांक - ८
## सभावृत्तांत

दिनांक - १३/११/२०१८ वेळ - **सकाळी** ११:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **ग** प्रभाग समितीची मासिक सभा मंगळवार दि.१३/११/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता ग प्रभाग कार्यालयाचे **“ग्रामदैवत बापुजी बुवा सभागृह”** येथे आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१. **मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन - सभापती**
२. मा.पवार मनिषा प्रमोद
३. मा.बारणे अर्चना तानाजी
४. मा.अभिषेक गोविंद बारणे
५. मा.कैलास ऊर्फ बाबा भालचंद्र बारणे
६. मा.सविता बाळकृष्ण खुळे
७. मा.संदिप काशिनाथ गाडे - स्विकृत सदस्य
८. मा.गोपाळ काशिनाथ माळेकर - स्विकृत सदस्य

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

श्रीम.स्मिता गंगाराम झगडे – क्षेत्रिय अधिकारी, श्री.आर.बी.जगताप – प्रशासन अधिकारी, श्री.व्ही.एम.गायकवाड – मुख्य लिपिक, श्री.एस.एस.कुलकर्णी – सहा.आरोग्य अधिकारी, श्री.देवन्ना गट्टुवार – कार्यकारी अभियंता (स्थापत्य), श्री.रामदास तांबे – कार्यकारी अभियंता, श्री.विजयकुमार काळे – उपअभियंता स्थापत्य, श्री.आर.डी.सुर्यवंशी - कनिष्ठ अभियंता श्री.बाबासाहेब गलबले - कार्यकारी अभियंता,विद्युत, श्री.दिलीप धुमाळ – उप अभियंता,विद्युत, श्री.बंडगर एस बी – कनिष्ठ अभियंता,जलनि:सारण, श्री.भाऊसाहेब साबळे – उपअभियंता, पाणीपुरवठा, श्री.पी पी पाटील – कार्यकारी अभियंता,जलनि:सारण, श्री. किशोर महाजन – उपअभियंता, जलनि:सारण, श्री.मगर एस एम –कनिष्ठ अभियंता, जलनि:सारण,श्री.मोरमारे – कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा, श्री.मोमीन ए. ए , श्रीम.सानप ए.व्ही, श्रीम.घोडके पी पी,श्री.कोरेवार, श्री.गजपुरे व्ही पी, कलाल आय के – कनिष्ठ अभियंता

स्थापत्य, श्री.सतिश तायडे, श्री.गणेश राऊत - कनिष्ठ अभियंता, विद्युत, श्री.डी.एन.गायकवाड – उद्यान अधिक्षक,श्री.जी एन खैरे – सहा.उद्यान निरीक्षक, श्री.बी के तापकिर – वृक्षसंवर्धन, श्री.सरवदे - अतिक्रमण अधिक्षक, श्री.बेद – मुख्य आरोग्य निरीक्षक इ. कर्मचारी उपस्थित होते.

-----

सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

दि. १/१०/२०१८ चे मासिक सभेचा सभावृत्तांत ( कार्यक्रमपत्रिका क्र. ७) कायम करणेत येत आहे.

ठराव क्रमांक - २६ विषय क्रमांक - १
दिनांक- १३/११/२०१८
सूचक- मा.कैलास बारणे अनुमोदक- मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.नगरसचिव यांचेकडील पत्र क्र.नस/०४/कावि/६२२/२०१८ दिनांक २१/०९/२०१८ चे पत्र

मा.नगरसचिव यांचेकडील पत्र क्र.नस/०४/कावि/६२२/२०१८ दिनांक २१/०९/२०१८ चे पत्रानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील मा.प्रभाग समिती नामनिर्देशित सदस्य यांना पुरविण्यात येणा-या सुविधांपैकी आयडेंटिटी कार्ड, व्हिजिटींग कार्ड, शिफारस पत्र, लेटरपॅड इ. सुविधा उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत येत आहे .

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक - विषय क्रमांक - २
दिनांक- १३/११/२०१८
सूचक- मा. अनुमोदक- मा.

संदर्भ – मा. ग क्षेत्रिय अधिकारी यांचे पत्र क्र.गक्षे/०२/कावि/५११/२०१८ दिनांक १८/०९/२०१८ चे पत्र

मा.क्षेत्रिय अधिकारी ग प्रभाग यांचे पत्र क्र.गक्षे/०२/कावि/५११/२०१८ दिनांक १८/०९/२०१८ चे पत्रानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ग क्षेत्रिय कार्यक्षेत्रातील एकुण ६४४ फेरीवाल्यांचे सर्व्हेक्षण झालेले आहे. त्यापैकी बायोमॅट्रिक झालेल्या फेरीवाल्यांची संख्या २८४ इतकी आहे. बायोमॅट्रिक झालेल्या फेरीवाल्यांपैकी २०६ फेरीवाल्यांना फेरीवाला नोंदणी प्रमाणपत्र वाटप करण्यात आलेले आहे. ज्यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आलेले आहे, त्यांना जागा निश्चीत करणे आवश्यक आहे.

याबाबत हॉकर्स झोन पुन:स्थापित करणेसाठी क्षेत्रिय अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली उपसमिती स्थापन करणेबाबत दि.२७/३/२०१८ रोजीच्या शहर फेरीवाला समिती सभेमध्ये मा.आयुक्त यांनी सुचविल्यानुसार हॉकर्स झोन तयार करणेसाठी केंद्र व राज्यशासन यांचे नियम व मनपाने तयार केलेल्या धोरणानुसार प्रभाग स्तरावर एक उपसमिती स्थापन करण्यात येत आहे. ती खालीलप्रमाणे –

प्रभाग हॉकर्स झोन फेरीवाला उपसमिती

१) श्रीम.स्मिता झगडे – अध्यक्ष – क्षेत्रिय अधिकारी, ग क्षेत्रिय कार्यालय

२) श्री.देवन्ना गट्टुवार – सदस्य – कार्यकारी अभियंता, स्थापत्य, ग क्षेत्रिय कार्यालय

३) श्री.सुनिल भागवानी – सदस्य - उपअभियंता नगररचना विभाग

४) श्री.सतिष माने – सदस्य – वरिष्ठ पोलिस निरीक्षक, वाकड

५) श्री.एस एस घोळवे – सदस्य वाहतुक पोलिस निरीक्षक, वाकड

६) श्री.किशोर म्हसवडे – सदस्य वाहतुक पोलिस निरीक्षक,पिंपरी

७) श्री.हनुमंत रोकडोबा सरवदे – सदस्य अतिक्रमण निरीक्षक,अतिक्रमण विभाग (स्थापत्य)

८) श्री.एफ डी ए प्रतिनिधी (food & drug administration) (अन्न सुरक्षा प्रशासन)

९) फेरीवाला संघटनेचे सदस्य

   १) श्री. शंकर शिनगारे – घर क्र.४२१/२ ज्योतिबा नगर काळेवाडी पुणे १७

   २) श्री.निलेश राजेंद्र जाधव – यशोदा कॉलनी, रहाटणी फाटा, पुणे १७

   ३) श्री.अमित कुदळे – पिंपरी पुणे १७

सबब उपरोक्त प्रमाणे नियुक्त केलेल्या समितीस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(मा.अध्यक्ष यांचे अनुमतीने विषय क्रमांक २ मागे घेणेत आला)

सदर विषय मागे घेणेत येत आहे.

------

ठराव क्रमांक - २७ विषय क्रमांक - ३

दिनांक- १३/११/२०१८

सूचक- मा.अभिषेक बारणे अनुमोदक- मा.सविता खुळे

संदर्भ – मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे यांचे दिनांक २२/१०/२०१८ चे पत्र

मा. संदीप बाळकृष्ण वाघेरे यांचे दिनांक २२/१०/२०१८ चे पत्रानुसार शहरामध्ये माजी नगरसदस्य/नगरसदस्या, स्वीकृत नगरसदस्य यांचे जुने झालेले दिशादर्शक फलक काढण्यात आलेले आहेत. प्रभागामध्ये इतरत्र कचरा टाकण्याचे ठिकाणावर सदर फलकांची दुरुस्ती करुन त्यावर कचरा न टाकण्याचे विनंती फलक बसविण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक - विषय क्रमांक - ४

दिनांक- १३/११/२०१८

सूचक- मा. अनुमोदक- मा.

संदर्भ – मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे यांचे दिनांक २२/१०/२०१८ चे पत्र

मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे यांचे दिनांक २२/१०/२०१८ चे पत्रानुसार पिंपरी येथील पवनेश्वर मंदिराजवळ १५ मीटर व १८ मीटर डी.पी एकत्र येऊन सदर ठिकाणी चौक तयार

होणार आहे. सदर चौकास कै.साथी दामुआण्णा कुदळे (मा.सरपंच) असे नामकरण करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

सदर विषय तहकुब करणेत येत आहे.

------

## सभा कामकाजात ऐनवेळी दाखल करुन घेणेत आलेला विषय खालीलप्रमाणे

ठराव क्रमांक - २८ विषय क्रमांक - ५

दिनांक- १३/११/२०१८

सूचक- मा.अर्चना बारणे अनुमोदक- मा. अभिषेक बारणे

संदर्भ – मा.मनिषाताई पवार यांचे दिनांक १३/११/२०१८ चे पत्र

मा.मनिषाताई पवार यांचे दिनांक १३/११/२०१८ चे पत्रानुसार औंध रावेत बी आर टी मार्गावरील १६ नंबर येथील प्रभाग क्रमांक २३ – २४ मध्ये असणा-या सिमेवरील रस्ता वृंदावन स्वीट, ममता हॉस्पिटल ते बारणे कॉर्नर या रस्त्यांमध्ये मुळ शेतकरी असणारे कै.ह.भ.प. गोपाळ उर्फ नाना बारणे यांची शेती रस्त्यामध्ये गेलेली आहे. त्यामुळे या रस्त्याचे नामकरण कै. ह.भ.प. गोपाळ उर्फ नाना बारणे मार्ग असे करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

**दि. १३/११/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता ग प्रभाग कार्यालयाचे मासिक सभेत खालीलप्रमाणे चर्चा झाली.**

मा.अध्यक्ष श्री.बाबासाहेब त्रिभुवन यांचे अनुमतीने सभेस सुरुवात करण्यात आली.

**मा.संदिप गाडे -** नामनिर्देशीत स्वीकृत सदस्य यांना पुरविण्यात येणा-या सुविधांबाबत असलेल्या विषयासाठी उपसुचना आहे . स्वीकृत सदस्यांना बोर्ड देण्यात यावे, स्वीकृत सदस्यांचे नामफलक काढण्यात आलेले आहे.

**श्रीमती स्मिता झगडे ( प्रभाग अधिकारी) -** यासंदर्भात आयुक्तांनी परिपत्रक काढलेले आहे**,** त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

**मा.संदिप गाडे –** याबाबत स्थायी समितीकडे प्रस्ताव पाठवा, मान्यता द्यायची का नाही ते ठरवतील.

**श्रीमती स्मिता झगडे ( प्रभाग अधिकारी) -** सन्माननीय सदस्यांचे २ बोर्ड ठेवण्यास मा.आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे. दोन बोर्ड व्यतिरीक्तचे अनधिकृत बोर्ड स्थापत्य विभागामार्फत काढणेत यावे. अनधिकृत खाजगी बोर्ड काढणेची जबाबदारी अतिक्रमण विभागाची आहे.

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष) -** सदर बोर्ड किती दिवसात काढण्यात येतील ते सांगावे.

**मा.कैलास बारणे –** बीआरटी चौकात काही बोर्डमुळे वाहनांना वळण घेतांना समोरचे दिसत नाही.

**श्री.सरवदे (अतिक्रमण विभाग) -** कार्यालयीन यंत्रणा पाहुन लवकरात लवकर सदर काम करण्यात येईल.

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष) -** रविवारीही अतिक्रमण विभाग कार्यरत पाहिजे.

**श्रीमती स्मिता झगडे ( प्रभाग अधिकारी) –** अतिक्रमण विभागाने सुटीचे दिवशी काम केल्यास अतिकालीन भत्ता किंवा पर्यायी सुट्टी मिळते का?

**श्री.सरवदे (अतिक्रमण विभाग) –** सुट्टीचे दिवशी कामकाजाबाबत तसा कार्यालयीन आदेश काढावा लागेल.

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष) -** सुट्टीचे दिवशी अतिक्रमण विभागाने काम करावे याबाबत आयुक्तांशी चर्चा व्हावी.

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष) -** मा.संदिप वाघेरे यांचे दिनांक २२/१०/२०१८ चे पत्र आहे. त्यानुसार जुने झालेले जे बोर्ड काढण्यात आलेले आहे, त्यावर कचरा न टाकण्याचे विनंती फलक बसविण्यात यावे.

**श्री.देवान्ना गट्टुवार (स्थापत्य) -** जुने बोर्ड काढुन नवीन बोर्ड करुन घेऊ.

**मा.गोपाळ माळेकर -** मा.नामनिर्देशीत स्वीकृत सदस्य यांना प्रभाग समिती सभेमध्ये विषय मांडणेबाबतचे अधिकारासंदर्भात योग्य ती माहिती देणेत यावी.

**श्रीमती स्मिता झगडे ( प्रभाग अधिकारी) -** मा.नामनिर्देशीत स्वीकृत सदस्य यांना प्रभाग समिती सभेमध्ये विषय मांडणे, उपसुचना देणे याबाबत नगरसचिव विभागाकडुन माहिती घेऊन कळविण्यात येईल.

**मा.संदिप गाडे –** मा.ग प्रभाग समिती सभेस काही नगरसदस्य उपस्थित नसतात, लागोपाठ ३ सभेस अनुपस्थीत राहिल्यास नगरसदस्याचे पद रद्द होते. याबाबत प्रशासनाने योग्य तो निर्णय घ्यावा.

**श्रीमती स्मिता झगडे ( प्रभाग अधिकारी) –** प्रभाग समिती सभेमध्ये असा काही नियम नाही.

**मा.गोपाळ माळेकर -** रहाटणी शाळा क्र.५५ येथे पाण्याची टाकी नसल्यामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे. येथे पाण्याची टाकी कधी होणार आहे.

**श्री.देवान्ना गट्टुवार (स्थापत्य) -** या कामाची वर्क ऑर्डर येणार आहे, त्यानंतर एक ते दीड महिन्यात काम सुरु होईल.

**मा.गोपाळ माळेकर –** आतापर्यंत सदर काम सुरु होणे अपेक्षित होते.

**मा.संदिप गाडे –** ड्रेनेजचे काम वेळेवर होत नाही, एका कामासाठी ३ महिने लागतात. आम्हाला नागरिकांना उत्तरे द्यावी लागतात. पवार नगरमधील ड्रेनेज लाईन बदलण्यास सांगितली होती.

**श्री.किशोर महाजन ( उपअभियंता, जलनि:सारण) -** समक्ष पाहणी करुन तेथील परिस्थीती पाहुन काम करण्यात येईल.

**मा.संदिप गाडे –** बरेच वेळा ठेकेदार उपलब्ध नाही म्हणुन काम झाले नाही अशा प्रकारच्या अडचणी सांगुन कामे टाळली जातात.

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष) -** मा.आयुक्त यांचे उपस्थितीत झालेल्या सभेमध्ये BRT मार्गातील वाहने काढण्याबाबत चर्चा झाली होती. त्यावेळी ३० ऑक्टोबर पर्यंत काम होईल असे सांगण्यात आले होते.

**श्रीमती स्मिता झगडे ( प्रभाग अधिकारी) –** BRTविभागाचे प्रतिनिधींनी याबाबत माहिती द्यावी.

**श्री.सुर्यवंशी (कनिष्ठ अभियंता BRT)** – याबाबत वाहतुक विभागाला पत्र दिले होते. वाहतुक विभागाच्या प्रतिनिधींबरोबर साईट व्हिजीट करुन नो पार्किंगचे नोटिफीकेशन करु, कारण कारवाई करायला अडचण येते.

**मा. बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष) -** BRT सुरु करा अथवा वाहतुकीस रस्ता मोकळा करा.

**श्री.सुर्यवंशी (कनिष्ठ अभियंता BRT)** - सदर निर्णय हा धोरणात्मक असल्याने मा.आयुक्त यांचे मान्यतेने होईल.

**श्रीमती स्मिता झगडे ( प्रभाग अधिकारी) –** BRT सुरु होणेबाबत काय नियोजन आहे, याबाबत BRTविभागाने आयुक्तांशी चर्चा करावी. याबाबत वेळ होणार असेल तर बॅरीगेट काढण्यात यावे.

**श्री.एस एस कुळकर्णी (सहा.आरोग्य अधिकारी) -** आरोग्य विभागाने साफसफाई संदर्भात बीआरटी विभागाला पत्र दिलेले आहे.

**मा.संदिप गाडे –** स्थापत्य विभागाचे प्रभाग क्रमांक २३ व २४ चे कनिष्ठ अभियंता काम करत नाहीत, त्यांनी त्यांच्या अडचणी सांगाव्या.

**मा.कैलास बारणे –** थेरगाव येथील बापुजी बुवा उद्यान येथे नवीन ब्लॉक बसविण्यात आले. असे असतांना जुने ब्लॉक कुठे वापरण्यात आले याची माहिती द्यावी.

**मा.गोपाळ माळेकर –** विद्युत विभागातील कर्मचा-यांनी आयुक्तांकडे तक्रार केली आहे की त्यांना गेल्या ६ महिन्यापासुन अतिकालीन भत्ता मिळालेला नाही. याबाबत योग्य तो निर्णय घेणेत यावा.

**श्रीमती स्मिता झगडे ( प्रभाग अधिकारी)** – विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी याबाबत चौकशी करावी.

**मा.संदिप गाडे -** पाणीपुरवठा विभागामध्ये अधिकारी किती वर्ष झाले काम करतात, याबाबत माहिती द्या. उद् घाटन कार्यक्रमांचे निमंत्रण नामनिर्देशीत स्वीकृत सदस्यांना देणेत यावे. निमंत्रण दिले जात नाही.

**श्री.रामदास तांबे (कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा)** – सदर कार्यक्रमांचे निमंत्रण देण्याचे काम हे जनता संपर्क विभागाकडुनच केले जाते.

**मा.संदिप गाडे -** शिक्षण मंडळाने माध्यमिक व प्राथमिक शाळेत होणा-या कार्यक्रमांबाबत नगरसदस्यांना तसेच स्वीकृत सदस्यांना कळविण्यात यावे. शिक्षणमंडळाच्या प्रतिनीधींनी सदर निर्णयाबाबत मुख्याध्यापकांना पत्राव्दारे कळविण्यात यावे.

वरीलप्रमाणे नेमुन देण्यात आलेल्या कामकाजाचा आढावा पुढील बैठकीमध्ये घेण्यात येईल असे सांगुन सर्वांचे आभार मानुन मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**अध्यक्ष**
**ग प्रभाग समिती**
**थेरगाव– ३३.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग क्षेत्रीय कार्यालय, थेरगाव - ३३
क्र-गक्षेका/कावि/४/     /२०१८
दिनांक -     /११/२०१८

**प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)**
**क्षेत्रीय कार्यालय,**
**थेरगाव – ३३**

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी

२/- आपले विभागाशी संबंधित असणा-या विषयाबाबत झालेल्या ठरावानुसार नियमाधीन कार्यवाही करणेत यावी, यासंदर्भात  वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही